# **श्री. यमाई देवी ट्रस्ट, कनेरसर**

दिनांक 04/02/2022.
स्थळः– श्री. यमाई देवी मंदिर, परिसर कनेरसर

## **जाहीर लिलावाची नोटीस**

सर्व संबंधीतांना या नोटीसीव्दारे सुचित करण्यात येते की, श्री. यमाई देवस्थानच्या ताब्यातील व देवस्थानच्या जमिनीतील एकुण **तीन (03)** चिंचेच्या झाडांना लागलेल्या चिंचांची जाहिर लिलावाव्दारे विक्री करण्याचे विश्वस्थ मंडळाच्या दिनांक 16/01/2022 च्या सभेत ठरले आहे.

सदरील लिलावा बाबतची प्रक्रिया ही संचालक मंडळातील सदस्य व ग्रामपंचायत कनेरसर चे सरपंच श्रीमती सुनिता केदारी यांच्या उपस्थितीत श्री. यमाई देवस्थान कार्यालय, कनेरसर येथे दिनांक **15/02/2022 रोजी सकाळी 11:00** वाजता पार पाडण्यात येईल. तरी सर्व इच्छुकांनी आपला सहभाग नोंदवावा.

**जाहिर लिलावा बाबतच्या सुचना :–**

1. मागील वर्षात या चिंचांच्या विक्रीतुन एकुण रक्कम रुपये 16,000/– प्राप्त झाले होते. परंतु तीन चिंचांच्या झाडापैकी एका झाडाच्या धोकादायक फांद्या हया वन विभागाच्या परवानगीने संबंधीतांनी तोडल्या असल्यामुळे वर नमुद तीनही चिंचांच्या झाडांना लागलेल्या चिंचांची एकत्रित किमान आधारभुत किंमत ही रुपये 15,000/– ठरवण्यात आली आहे.

2. लिलावामध्ये वर नमुद किमान किमतीपेक्षा जास्तीत जास्त लावण्यात आलेली बोली ही आवाजी स्वरुपात स्वीकारण्यात येईल.

3. ज्या व्यक्तीची बोली स्वीकारण्यात आली त्या व्यक्तीने देवस्थानच्या युनियन बॅक ऑफ इंडिया शाखा, कनेरसर येथील शाखेत बोली स्वीकारण्यात आलेल्या तारखेपासुन पुढील **सात दिवसाच्या** आत बोलीची रक्कम भरावी. तसे न केल्यास लावलेली बोली रद्द करण्यात येईल.

4. स्वीकारण्यात आलेल्या बोलीची रक्कम भरण्यासाठी देवीचे युनियन बॅक ऑफ इंडिया शाखा, कनेरसर येथील बॅक खात्याचा तपशिल खालील प्रमाणे;

**बॅकेचे नाव :– युनियन बॅक ऑफ इंडिया, शाखा कनेरसर**
**खाते क. :– 646402010000001**
**आय. एफ. एस. सी. कोड :– UBIN0564648**

5. वर नमुद खात्यात ठरलेल्या बोलीची रक्कम भरल्यानंतरच व पावतीची झेरॉक्स प्रत विश्वस्त मंडळाकडे जमा केल्या नंतरच चिंचा तोडण्याची परवानगी असेल.

6. चिंचा तोडतांना झाडांना व झाडांच्या फांदयांना कुठल्याही प्रकारचे नुकसान होवू नये याची खबरदारी घ्यावी.

7. चिंचा तोडण्याची जबाबदारी व मजुरी ही बोली लावणा–या इसमांकडे राहील. यासाठी देवस्थान समितीकडून कुठलीही मदत किंवा मजुरी देण्यात येणार नाही. तसेच चिंचा तोडतांना संबंधीतांनी योग्य ती खबरदारी घ्यावी. यात कोणतीही शारिरीक इजा एखाद्या इसमास झाल्यास त्यास मंदिर प्रशासन जबाबदार राहणार नाही.

8. लिलाव प्राप्त झालेल्या व्यक्तीकडे बोली लावलेल्या तारखेपासुन पुढे चिंचा पिकेपर्यंत व तोडणी करेपर्यंत संबंधीत चिंचाच्या झाडांना लागलेल्या चिंचांची जबाबदारी असेल. यामध्ये दरम्यानच्या कालावधीत काही नुकसान झाल्यास त्यास मंदिर प्रशासन जबाबदार राहणार नाही.

बोली स्वीकृत करण्याचे सर्वाधिकार हे विश्वस्त मंडळाकडे असतील. या लिलाव प्रक्रियेसाठी संचालक मंडळातील सदस्य व ग्रामपंचायत कनेरसर चे सरपंच **श्रीमती. सुनिता केदारी तसेच देवस्थान कर्मचारी श्रीमती पुनम मानमोडे (मो. नं. 7028310934)** यांच्याशी संपर्क साधावा.

| सचिव | चेअरमन |
|---|---|
| **श्री. यमाई देवी ट्रस्ट, कनेरसर** | **श्री. यमाई देवी ट्रस्ट, कनेरसर** |